दाखल दि. :२६/०४/२०११
नोंदणी दि.: २६/०४/२०११
निकाल दि.:१०/०४/२०२६
कालावधी:१४वर्ष, ११महिने, १५दिवस

**पाथर्डी येथील सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी – शिरीषकुमार दि. वाघमारे)**

**निशाणी क्र. ७७**

# नियमित दिवाणी दावा नं. १२१/२०११
CNR:MHAH200002532011

१. **सोपान दादाबा बुधवंत,**
वयः ५० वर्षे, व्यवसायः शेती,
रा. शिरापुर, ता. पाथर्डी,
जि. अहमदनगर. .... **वादी**

**विरुध्द**

१. **बबन दादाबा बुधवंत,**
वयः ४१ वर्षे, धंदाः शेती,
रा. सानेवाडी, स्टेशनरोड,
साईप्रेरणा सोसायटी, बिल्डींग नं १अ१ तळमजला,
कुळगांव, बदलापुर(पश्चिम), ता. अंबरनाथ, जि. ठाणे,
२. **आदिनाथ दादाबा बुधवंत,**
वयः ५४ वर्षे, धंदाः शेती,
३. **रखमाबाई दादाबा बुधवंत (मयत),**
४. **शांताबाई सोपान बुधवंत,**

वयः ३९ वर्षे, धंदाः शेती,

५. **मथुराबाई आदिनाथ बुधवंत,**
वयः ५१ वर्षे, धंदाः शेती,
प्रतिवादी क्र.२ ते ५ रा. शिरापुर, ता. पाथर्डी,
जि. अहमदनगर.

**सामील प्रतिवादी**

६. **द्रोपदी भूजंग पालवे**
वयः ५५ वर्षे, धंदाः शेती,
रा. चिचोंडी ता. पाथर्डी जि. अहमदनगर.

७. **साखरबाई बाबासाहेब चौरे**
वयः ४३ वर्षे, धंदाः घरकाम,
रा. धानोरा रोड, भगवान कॉलणी बीड, ता. जि. बीड

८. **मथूरा बाबासाहेब शिरसाट**
वयः ४१ वर्षे, धंदाः शेती,
रा. कुळगांव, बदलापुर बॅरेजरोड कैलास विहार रुम नंबर बी.२
ता. अंबरनाथ जि. ठाणे

९. **सुशिला मारुती बुधवंत,**

१०. **विमलबाई रमाकांत साळवे,**

११. **मारुती नाथा बुधवंत,**

१२. **संदीप प्रकाश बुधवंत,**

१३. **मिलींद प्रकाश गवारे,**

१४. **स्मिता प्रकाश गवारे,**

**१५. शारदा प्रकाश गवारे,**

**१६. दत्तु तुळशिराम महाडीक,**

**१७. कुंडलिक मारुती गवारे,**

**१८. भाउराव मारुती गवारे,**

**१९. विष्णु मारुती गवारे,**

**२०. हरि भाउराव गवारे,**

**२१. शशिकला भाउराव गवारे,**

**२२. सुहास दामु गवारे,**

**२३. महाविर चंपालाल छाजेड,**

**२४. संतोष चंपालाल छाजेड,**

**२५. नामदेव भाउ लोमटे,**

**२६. शशिकांत लक्ष्मण साळवे. ...... प्रतिवादी.**

**( प्रतिवादी क्र. ९ ते २६ यांचेविरुध्द निशाणी ०१ वरील दि. ०६.११.२०१९ रोजीच्या आदेशाने दावा डिसमिस करण्यात आला)**

**दावाः वाटप, कब्जा व कायम मनाई हुकूमासाठी.**

वादीतर्फे – विधीज्ञ श्री. एस. बी. सारुक.

प्रतिवादी १ तर्फे – विधीज्ञ श्री. आर. एन. खेडकर,(विना कैफियत).

प्रतिवादी क्र.३ व ४ तर्फे – श्री. एस. ए. वेलदे.(दावा मान्य).

प्रतिवादी क्र.७ व ८ तर्फे – श्री. ए. एन. पठाडे (दावा मान्य).

प्रतिवादी नं. २, ५ व ६ तर्फे एकतर्फा.

## न्यायनिर्णय

{घोषित दि. १० एप्रिल, २०२६}

**१.** वादीने प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे.

**२.** मौजे शिरापूर ता. पाथर्डी येथील शेत जमीन मिळकत

| अ. क्र. | गट नं. | क्षेत्र | | आकार | | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हे | आर | रु | पै | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १. | ८३ | ० | २१ | ० | ८५ | गट नं. ८४ | रस्ता | गट नं. ८२ | गट नं. ८१ |
| २. | १६७ | २ | १९ | १ | ७२ | गट नं. १६५ | गट नं. १६८ | रस्ता | गट नं. १६६ |
| | पो. ख. | ० | ०३ | | | | | | |
| | एकुण | २ | २२ | | | | | | |
| ३. | २३१ | ० | ४० | ० | ८६ | रस्ता | गट नं. २३४ | गट नं. २३० | गट नं. २३२ |
| ४. | १२२/१ | ३ | २० | २ | ७५ | ग.नं.१२०, १२१, १७३ | ग. नं. १२६, १२७, १२८, १२५ | ग. नं. १२३, ४२४, १२५ | ग. नं. १२१ |
| यापैकी चार आणे हिश्याची जंगल वहिवाटीप्रमाणे जमिन प्रतिवादी नं. २ व ४ हिचे नावावरील जमिन मिळकत. | | | | | | | | | |
| ५. | १२२/३ | १ | ७४ | १ | ४४ | ग.नं. १२०, | ग.नं. १२६, | ग.नं. | ग. नं. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १२१, १७३ | १२७, १२८, १२५ | १२३, ४२४, १२५ | १२१ |
| यापैकी चार आणे हिश्याची जंगल वहिवाटी प्रमाणे जमिन प्रतिवादी नं. २ व ४ हिचे नावावरील जमिन मिळकत | | | | | | | | | |
| ६. | १२२/४ | १ | ६२ | १ | ३१ | ग.नं.१२०, १२१, १२७, १७३ | ग.नं. १२६, ४२४, १२८, १२५ | ग.नं. १२३, १२५ | ग.नं. १२१ |
| | पो. ख. | ० | १९ | | | | | | |
| | एकुण | १ | ९१ | | | | | | |
| ७. | ३४४ | ० | ७० | ० | ३५ | रस्ता | नदी | नदी | ग.नं. ३४५ |
| ८. | ११६ | २ | ३४ | ३ | ०९ | नदी | ग.नं.११७ | ग.नं. ११५ | ग.नं. ११५ |
| | पो. ख. | ० | ४२ | | | | | | |
| | एकुण | २ | ७६ | | | | | | |
| यापैकी ०.५५ आर क्षेत्राची जंगल वहिवाटीप्रमाणे जमिन प्रतिवादी नं. १ यांचे नावावरील जमिन मिळकत | | | | | | | | | |

या मिळकतीबाबत दावा दाखल असून त्याला यापुढे संक्षिप्तपणे "वाद मिळकती" असे संबोधित करण्यात आले आहे.

**३.** वादीचे असे कथन आहे की, वंशावळीत दर्शविल्या प्रमाणे मुळ पुरुष दादाबा बाबुराव बुधवंत हे होते व ते सुमारे १८ वर्षापुर्वी मयत झाले. मयत दादाबा यांना पत्नी रखमाबाई प्रतिवादी नं. ३ ही आहे. मयत दादाबा पासुन रखमाबाई हिस तिन मुले प्रतिवादी क्र. १ बबन, प्रतिवादी क्र. २ आदिनाथ व वादी. तसेच प्रतिवादी क्र. ६ ते ८

द्रोपदी, साखरबाई, मथुरा या तीन मुली आहेत.

**४.** मुळ पुरुष दादाबा यांनी त्यांचे हयातीत तिन मुली सामिल प्रतिवादी नं.६ ते ८ यांची लग्न कार्य करून दिली आहेत व लग्न झाले पासुन त्यांचे सासरी नांदत आहेत. वादी व प्रतिवादी नं. १ ते ५ यांचे एकत्र हिंदु कुटुंबातील वादी हा एक घटक आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी नं. १ ते ३, सामिल प्रतिवादी नं. ६ ते ८ यांचे कुटुंबाचे मुळ पुरुष दादाबा बाबुराव बुधवंत यांचे हयातीत त्यांना मौजे शिरापुर ता. पाथर्डी येथील दावा मिळकत जमिन ग.नं.८३ व १६७ अशा वडिलोपार्जीत मालकीच्या असतांना वडिलोपार्जीत मालकीचे जमिनीचे मिळणारे उत्पन्नातुन आलेल्या पैशातुन मुळ पुरुष दादाबा यांनी एकत्र कुटुंबाचे फायदयासाठी व उपयोगासाठी दावा मिळकत जुना स.नं. १०६/८८ ३ब, ४अ तिचा हल्लीचा जमिन ग.नं. २३१ क्षेत्र ०.४० आर ही जमिन सन १९७६ मध्ये प्रतिवादी नं. ३ हिचे नावावर खरेदीखताने घेतलेली आहे.

**५.** वादीचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर वादी हा सन १९७८ मध्ये मुंबई येथे बी.एस.टी. खात्यात ड्रायव्हरचे नोकरीस लागला असतांना मुळ पुरुष दादाबा यांनी सदर वडिलोपार्जीत व खरेदी मालकीचे जमिनीचे मिळणारे उत्पन्नातुन आलेल्या पैशातुन व वादीचे नोकरीचे 'पैशातुन प्रतिवादी नं. ३ हिचे नावावरील खरेदी मालकीची ग.नं. २३१ मध्ये सन. १९७९ मध्ये एक विहिर खोदली व तिला पाणी लागले आहे व तिचेवर

इलेक्ट्रीक मोटार बसवुन ५०० फुटाची पाईपलाईन एकत्रात केलेली आहे. दादाबा यांनी त्यांच्या हयातील तिन्हीही मुलींना लग्नामध्ये प्रत्येकीला रोख रक्कम रुपये १०,०००/- दिल्याने सामिल प्रतिवादी नं. ६ ते ८ यांनी त्यांचा वडिलोपार्जीत व वरील खरेदी मालकीचे जमिनीतील असलेला हक्क व हिस्सा स्वखुशीने कायम स्वरुपी सोडुन दिलेला आहे.

**६.** वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी यांनी सन १९७८ ते सन १९८५ पावेतो मुंबई येथे बी.एस.टी.खात्यात ड्रायव्हरची नोकरी केली व त्यानंतर वादी हा सन १९८६ पासुन एस.टी.खात्यात नोकरीस लागला व सदरची नोकरी करीत असतांना मुळ पुरुष दादाबा यांनी त्यांचे एकत्र कुटुंबाला राहण्यासाठी स.नं. २७/२अ, २ब१, २ड, २क१ चा हल्लीचा ग.नं. ८३ मध्ये सन १९८२ चे सुमारास पत्र्याच्या दोन खोल्याचे बांधकाम केलेले आहे व त्यामध्ये ते राहु लागले असतांना वादी प्रतिवादी नं. १ ते ५ व मुळ पुरुष दादाबा यांनी त्यांचे वरील वडिलोपार्जीत व खरेदी मालकीचे जमिनीचे मिळणारे उत्पन्नातुन आलेल्या पैशातुन व वादी यांचे नोकरीचे मिळणारे पैशातुन त्यांचे एकत्र कुटुंबाचे फायदयासाठी व उपयोगासाठी दावा मिळकत ग.नं. १२२/१, १२२/३, १२२/४ मधील ४ आणे हिश्याची जमिन मुळ पुरुष दादाबा यांचे तिन मुलांपैकी वादी व प्रतिवादी नं.२ यांचे नावावर दिनांक २७/४/१९८८ रोजी कायम खरेदीखताने विकत

घेतलेली आहे. तसेच वादी व प्रतिवादी नं. २ यांची ७/१२ पत्रकी फेरफार नं.४९९ अन्वये नोंदी झालेल्या आहेत.

**७.** वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी हा एस.टी. खात्यात नोकरी करीत असतांना मुळ पुरुष दादाबा यांनी वादी, प्रतिवादी नं. १ ते ५ यांचे एकत्र कुंटुंबासाठी वरील वडिलोपार्जीत व वादी, प्रतिवादी नं.२,३ यांचे नावावरील जमिनीचे मिळणारे उत्पन्नातुन मिळालेल्या पैशातुन व वादी यांच्या नोकरीच्या मिळालेल्या पैशातुन एकत्र कुटुंबाचे फायदयासाठी व उपयोगासाठी ग.नं. ३४४ क्षेत्र ०.७० आर ही जमिन व त्यामधील विहिर पाणी, ३ चिंचाचे झाडे, ३ लिंबाची झाडे त्यामधील हिश्या प्रमाणे दिनांक ५/९/१९८९ रोजी प्रतिवादी नं.१ यांचे नावावरील कायम खरेदीखताने विकत घेतली आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी नं. १ यांची फेरफार नं. ७८१ अन्वये ७/१२ पत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटला नावाची नोंद झाली आहे.

८. वादीचे पुढे असे कथन आहे की, मुळ पुरुष दादाबा हे सन १९९० मध्ये मयत झाल्यावर वादी, प्रतिवादी नं. १, २ हे सर्वजण वरील वडिलोपार्जीत व खरेदी मालकीचे जमिनीची एकत्रात मेहनत मशागत करुन उत्पन्न घेवु लागले. त्यानंतर सन १९९० मध्ये वादीने नोकरीचे आलेल्या पैशातुन व वरील वडिलोपार्जीत खरेदी मालकीचे जमिनीचे मिळणा–या उत्पन्नातुन आलेल्या पैशातुन वादी, प्रतिवादी नं.१, २ यांनी त्यांचे एकत्र

कुटुंबाचे फायदयासाठी व उपयोगासाठी ग.नं. ३४४ मध्ये एक नविन विहिर खोदली व तिला पाणी लागलेले आहे. तसेच सदर विहिरीवर इलेक्ट्रीक मोटार बसवुन तिचेवर ४०० फुटाची पाईपलाईन एकत्रात केलेली आहे. त्याच प्रमाणे सदर ग.नं. ३४४ मध्ये राहण्यासाठी पत्र्याच्या दोन खोल्या व छप्पर बांधले आहे. त्यानंतर सन १९९२ मध्ये प्रतिवादी नं. १ हा मुंबई महानगर पालिकेत ड्रायव्हरचे नोकरीस लागला. त्यानंतर वादी, प्रतिवादी नं.१, २ यांनी एकविचाराने त्यांचे कुटुंबाला शासकिय योजनेचे फायदे मिळण्यासाठी व त्यांचे कुटुंब व्यवस्थेसाठी वादीची पत्नी प्रतिवादी नं. ४ हिचे नावावर वादीचे नावावरील खरेदी घेतलेल्या जमिनी करण्याचे ठरविले. दिनांक २६/३/१९९९ रोजी वादी यांनी त्यांची पत्नी शांताबाई प्रतिवादी नं. ४ हिचे नावावर दावा मिळकत अ.नं. ४ ते ६ मध्ये वर्णन केलेल्या जमिन ग.नं. १२२/१, १२२/३, १२२/४ यातील जंगल वहिवाटी प्रमाणे चार आणे हिश्यातील वादीचा २ आणे हिश्याची जमिन विहिर पाणी हिश्याप्रमाणे रजिष्टर्ड बक्षिस पत्रान्वये नामधारी करुन दिलेली आहे व त्या प्रमाणे फेरफार नं. १३०४ अन्वये प्रतिवादी नं. ४ हिची ७/१२ पत्रकी नावाची नोंद झाली आहे.

**९.** वादीचे पुढे असे कथन आहे की, वरील वडिलोपार्जीत जमिनी व खरेदीमालकीच्या बक्षिसपत्रान्वये केलेल्या अशा सर्व जमिनी मध्ये वादी, प्रतिवादी नं. १, २ हे मालकी हक्काने एकत्रात मेहनत मशागत करुन उत्पन्न घेवु लागले असतांना वादी,

प्रतिवादी नं.१, २ यांनी त्यांचे वरील वडिलोपार्जीत व खरेदी मालकीच्या जमिनीच्या मिळणा–या उत्पन्नातुन आलेल्या पैशातुन व वादी, प्रतिवादी नं. १ यांच्या नोकरीच्या मिळालेल्या पैशातुन दावा मिळकत अ.नं. ८ मध्ये वर्णन केलेली जमिन ग.नं. ११६ क्षेत्र २ हे. ३४ आर पो.ख.०.४२ आर एकुण २ हे. ७६ आर या पैकी दक्षिणेकडील ०.५५ आर क्षेत्राची जमिन त्यातील विहिर पाणी हिश्यासह एकत्र कुटुंबाचे फायदयासाठी व उपयोगासाठी प्रतिवादी नं.१ यांचे नावावर दिनांक ३०/६/२००३ रोजी खरेदीखताने घेतलेली आहे. त्या प्रमाणे प्रतिवादी नं.१ यांची फेरफार नं. १३६६ अन्वये ७/१२ पत्रकी नावाची नोंद झाली आहे.

**१०.** वादीचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर वादी, प्रतिवादी नं.१,२ यांनी त्यांचे वरील वडिलोपार्जीत खरेदी मालकीचे जमिनीचे आलेल्या पैशातुन व वादी प्रतिवादी नं. १ यांचे नोकरीचे आलेल्या पैशातुन एकत्र कुटुंबाचे फायदयासाठी व उपयोगासाठी ग.नं. ११६ मधील ०.५५ आर क्षेत्रातील जमिनी मध्ये विहिरीचे पाणी घेण्यासाठी सामाईकातील इलेक्ट्रीक मोटारीने पाणी घेण्यासाठी विहिरी वरुन २५० फुटाची पाईपलाईन केलेली आहे. वादी, प्रतिवादी नं.१,२ यांनी वडिल दादाबा यांचे हयातीत व वडिलांचे मृत्युनंतर वरील प्रमाणे वडिलोपार्जीत जमिनीत व वेळोवेळी एकत्र कुटुंबासाठी खरेदी घेतलेल्या जमिनीत फार मोठा खर्च करून जमिनीची बांधबंदीस्ती लेव्हलींग करुन

सुधारणा केली जमिनीचा पोट सुधारला, जमिनीत विहिर पाडली सदरचे जमिनी ग.नं. ३४४ ग.नं. ११६ व ८३ या पुर्ण बागायती केल्या आहेत व विहिरीवर पाईपलाईन टाकुन जमिनीमध्ये पाणी घेवु लागले असतांना वादी हा सन १९८६ पासुन एस.टी. खात्यात ड्रायव्हरची नोकरी करु लागला असतांना वादी सन. २००४ पावेतो नोकरी केलेली आहे प्रतिवादी नं. १ हा आजही मुंबई महानगर पालीकेत ड्रायव्हरची नोकरी करीत आहे.

**११.** वादीचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी नं. २ हे आई रखमाबाई प्रतिवादी नं. ३ हिचे समवेत दावा मिळकती पैकी ग.नं. ३४४ मध्ये बांधलेल्या वस्तीत रहात आहेत. तसेच प्रतिवादी नं. १ हा नोकरी निमित्ताने सानेवाडी, कुळगांव बदलापूर, पश्चिम ता. अंबरनाथ जि. ठाणे येथे राहत आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ हे दावा मिळकतीची वेळोवेळी मेहनत मशागत करुन एकत्रात उत्पन्न घेत आलेले आहेत. प्रतिवादी नं. ३ हिने तिच्या नावावरील एकत्र कुटूंबाची मिळकत जमिन ग.नं. २३१ क्षेत्र ०.४० आर ही प्रतिवादी नं. ५ हिचे नावावर दिनांक ३/८/२०१० रोजीचे पोकळीस्त व नामधारी खरेदीखताने ट्रान्सफर केलेली आहे व प्रतिवादी नं. ५ हिची ग.नं. २३१ चे ७/१२ पत्रकी फेरफार नं. १९६८ नुसान नामधारी नावाची नोंद झाली असली तरी प्रतिवादी नं. ३,५ यांचे मध्ये कुठलेही प्रकारची देणे घेणेचा पैशाचा व्यवहार झालेला नाही. त्यामुळे प्रतिवादी नं. ५ हिस ग.नं. २३१ चा कधीही स्वतंत्रपणे कब्जा मिळालेला

नाही. वास्तविक ग.नं. २३१ मध्ये वादी व प्रतिवादी नं. १ ते ५ यांची एकत्रात कब्जे वहिवाट आजही आहे.

**१२.** वादीचे पुढे असे कथन आहे की, अलीकडे चार महिण्यापासुन वादी, प्रतिवादी नं.१, २ यांचेमध्ये दावा मिळकतींचे वहिवाटी वरुन वाद निर्माण होवु लागले, त्यामुळे वादी हा प्रतिवादी नं.१ ते ३,५ यांचेतुन विभक्त राहुन वेगळे खाऊ लागला आहे. प्रतिवादी नं. १ ते ३ व ५ यांनी वादीस दावा मिळकती पैकी प्रतिवादी नं. १,२ यांच्या नावावर एकत्र कुटुंबासाठी खरेदी घेतलेल्या जमिन ग.नं. १२२/१, १२२/३, १२२/४ या पैकी व ३४४ व ११६ व तसेच प्रतिवादी नं. ५ चे नावावरील ग.नं. २३१ या जमिनी मध्ये गेली एक महिण्यापासुन एकत्रात उपभोग घेणे मुश्किल केले असल्याने वादीने दिनांक २७/३/२०११ रोजी वादी, प्रतिवादी नं. १ ते ५ यांची घरात बैठक घेवुन वडिलोपार्जीत व खरेदी मालकीच्या अशा सर्व जमिनीतील वादीचा असलेला अविभक्त १/४ हिश्याचे प्रतिवादी नं. १ ते ५ यांना आपसात वाटप करुन पृथक करुन कब्जात देण्याची मागणी केली. प्रतिवादी नं. १ ते ३ व ५ यांनी त्यावेळी वादीस दावा मिळकतीचे आपसात वाटप करुन कब्जा देण्यास नकार दिला व ''आम्ही तुला मुळीच जमिनीचे वाटप करुन देणार नाहीत तुला काय करावयाचे ते कर'' असे म्हणाले. त्यानंतर सुमारे ८ दिवसापासुन प्रतिवादी नं.१, २ व ५ यांनी दावा मिळकतींपैकी त्यांचे नावावरील एकत्र

कुटुंबातील कब्जे वहिवाटीची जमिन ग.नं. २३१ व १२२/१, १२२/३, १२२/४ या पैकी व तसेच ३४४ व ११६ मधील जमिनीची बेकायदेशीररित्या विक्री करण्यासाठी मौजे शिरापुर येथील लोकांबरोबर सौदे सुरु केलेची वादीस खात्रीशिर माहिती झालेने वादीने प्रतिवादी नं. १, २,५ यांना दिनांक १६/४/२०११ रोजी पुन्हा समजावुन सांगितले परंतु प्रतिवादी नं. १, २,५ यांनी वादीला अरेरावीची भाषा केली. वडिलोपार्जीत व खरेदी मालकीचे सर्व जमिन मिळकतीत वादी, प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा अविभक्त प्रत्येकी १/४ हिस्सा आहे. वादी व प्रतिवादी नं. १ ते ५ यांचेमध्ये आजतागायत दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही. वादी व प्रतिवादी नं. १ ते ५ यांचे एकत्र हिंदु कुटुंबाला दावा मिळकतीची विक्री करण्याची कुठलीही आर्थीक अडचण नाही अगर खाजगी, बँकाचे व सोसायटीचे कोणतेही देणे दयावयाचे नसतांना प्रतिवादी नं. १,२ व ५ हे जाणुन बुजुन त्यांचे नावावरील एकत्र कुटुंबाची ग.नं. १२२/१,१२२/३, १२२/४ या पैकी व २३१, ११६, ३४४ या जमिनीतील वादीचा असलेला अविभक्त १/४ हिस्सा गिळंकृत करण्योच दृष्ट हेतुने त्रयस्थ ईसमाबरोबर बेकायदेशीररित्या सौदे करुन विल्हेवाट लावणेचे विचारात आहेत तसे झालेस वादीचे हक्कावर हिश्यावर बाधा घेवुन वादीला दावा मिळकतीमधील अविभक्त १/४ हिश्याला कायमचे मुकावे लागेल. म्हणुन वादी प्रतिवादी नं.१ ते ५ यांचे विरुध्द सदर वडिलोपार्जीत व एकत्र कुटुंबातील खरेदी मालकीच्या जमिन मिळकतीत वादीचा १/४ हिश्याचे प्रतिवादी नं. १ ते ५ यांचेकडुन मे. कोर्टा मार्फत वाटप

होवुन पृथक करून वादीचे प्रत्यक्ष कब्जात मिळण्यासाठी, तसेच दावा मिळकतींचे वादी व प्रतिवादी नं.१ ते ५ यांचेत मे. कोर्टा मार्फत वाटप होवुन वादीचे प्रत्यक्ष कब्जा मिळे पावेतो प्रतिवादी नं. १, २, ५ यांनी त्यांचे नावावरील जमिन ग.नं. १२२/१, १२२/३, १२२/४ या पैकी व २३१, ११६, ३४४ या जमिनीची त्रयस्थ ईसमा बरोबर बेकायदेशीररित्या साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, गहाण, दान अगर अन्य प्रकारे हस्तांततरीत करुन विल्हेवाट लावु नयेत असा कायमचा मनाई हुकुम मिळणेकामी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वादीचे पुढे असे कथन आहे की, त्याची प्रतिवादी क्र. ९ ते २६ विरुध्द काहीही मागणी नाही.

**१३.** प्रतिवादी क्र.१ सदर दाव्यामध्ये हजर होऊन देखिल कैफियत दाखल केली नसल्याने त्यांचे विरुध्द दावा विनाकैफियत चालविणेत आला. तसेच, प्रतिवादी क्र.०३ व ४ यांनी निशाणी–२९ कडे व  प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी निशाणी–३४ कडे पुरसीस दाखल करुन दावा मान्य केला आहे. प्रतिवादी क्र.२, ५ व ६ यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

**१४.** मी वादकथने व कागदपत्राचे अवलोकन करुन मुद्दे निश्चित केले आहेत मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत:–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने वाद मिळकती या एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून खरेदी केले असल्याचे शाबीत केले आहे काय ? | : अंशतः होकारार्थी |
| २. | वादी वाटप होऊन मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास प्रत्येकाचा किती हिस्सा आहे ? | : अंशतः होकारार्थी, गट क्र. ८३ व १६७ मध्ये वादी, प्रतिवादी क्र. १, २, ६, ७ व ८ यांचा प्रत्येकी १/६ इतका हिस्सा. |
| ३. | वादी प्रतिवादी क्र. १, २ व ५ हे दावा मिळकत हस्तांतरीत करण्याच्या तयारीमध्ये असल्याचे शाबित करतात काय ? | : नकारार्थी. |
| ४. | वादीने विनंती केल्याप्रमाणे मनाई हुकूम मिळण्यास वादी पात्र आहे काय ? | : नकारार्थी. |
| ५. | काय आदेश व हुकूमनामा? | : अंतिम आदेशा प्रमाणे. |

## कारणमिमांसा

१५. वादींनी त्यांच्या वाद कथनाच्या पुष्ठ्यर्थ खालील साक्षीदार तपासलेले आहेत:

| अ. क्र. | साक्षिदाराचे नाव | निशाणी |
|---|---|---|
| १. | सोपान दादाबा बुधवंत | ६८ |
| २. | बाबासाहेब विठोबा शिरसाट | ७३ |

**१६**. वादींनी त्यांच्या वाद कथनाच्या पुष्ठ्यर्थ खालिल कागदपत्र दाखल केलेली आहेत:

| अ. क्र. | कागदपत्राचे वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| १. | गट क्र.८३ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | ८ |
| २. | गट क्र. १६७ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | ९ |
| ३. | गट क्र. १२२/१ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | १० |
| ४. | गट क्र. १२२/३ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | ११ |
| ५. | गट क्र. १२२/४ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | १२ |
| ६. | गट क्र. ३४४ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | १३ |
| ७. | गट क्र. २३१ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | १४ |
| ८. | गट क्र. ११६ च्या ७/१२ उता–याची प्रमाणीत प्रत | १५ |
| ९. | फेर नं.४९९ ची प्रमाणीत प्रत | १६ |
| १०. | फेर नं.७८१ ची प्रमाणीत प्रत | १७ |
| ११. | फेर नं.१३०४ ची प्रमाणीत प्रत | १८ |
| १२. | फेर नं.१३६६ ची प्रमाणीत प्रत | १९ |
| १३. | फेर नं.१९६८ ची प्रमाणीत प्रत | २० |

प्रतिवादींनी प्रकरणामध्ये कागदपत्र दाखल केली नाहीत. तसेच, प्रकरणामध्ये

कोणताही साक्षीदार संधी देऊनही तपासला नसल्याने प्रतिवादींचा पुरावा दि.३०.०१.२०२५ रोजीच्या आदेशाने बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबत :-</u>**

**१७.** वादींतर्फे सुविध विधीज्ञ श्री. एस. बी. सारुक यांनी असा युक्तिवाद केला की, वाद मिळकती या वडीलोपार्जित व एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून खरेदी केल्या असल्याचे वादीने निशाणी ०८ ते २० कडील कागदपत्र व साक्षीदार क्र. ०१ व २ यांच्या तोंडी पुराव्याच्या आधारे शाबित केले आहे. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या नोकरीच्या पगारातील रकमेतून शेतीची दुरुस्ती करुन येणा-या उत्पन्नातून मिळकती खरेदी केल्या असल्याने त्यामध्ये वादी, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचा त्यामध्ये असलेला हिस्सा वाटपाद्वारे त्यांना देण्यात यावा. तसेच दरम्यानच्या काळामध्ये वाद मिळकतींचे हस्तांतरण करु नये अशी मनाई देखिल देण्यात यावी.

**१८.** वादीने त्याच्या वाद कथनांच्या पृष्टयर्थ सा. क्र. ०१ म्हणून त्याचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी ६८ कडे दाखल केले आहे. वादीने सदर शपथपत्रामध्ये त्याची दाव्यातील सर्व कथने आहे अशी नमुद केलेली आहेत. सदर कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ती संक्षिप्तपणे नमुद करीत आहे. सा. क्र. ०१ याने त्याच्या पुराव्यामध्ये जमिन गट नं. ८३ व १६७ या मुळ वडीलोपार्जित मिळकतीच्या उत्पन्नामधून गट नं.

२३१ ही मिळकत प्रतिवादी क्र. ३ च्या नावे सन १९७६ मध्ये खरेदी केल्याचे नमुद केले आहे. तसेच १९७८ ते १९८५ मध्ये वादी एस. टी. खात्यामध्ये नोकरीस असताना कुटूंबाला राहण्यासाठी स. नं. २७/२/अ, २ब१, २ड, २क१ ज्यांचा हल्लीचा गट नं. ८३ आहे त्यामध्ये पत्र्याच्या खोल्यांचे बांधकाम केले आहे.

**१९.** सा. क्र. ०१ ने पुढे त्याचे पुराव्यामध्ये गट नं. १२२/१, १२२/३ व १२२/४ मधील मिळकत ही त्याच्या व प्रतिवादी क्र. २ च्या नावावर दि.२७.०४.१९८८ रोजी खरेदीखताने जमिनीच्या उत्पन्नातून व नोकरीच्या पैशातून विकत घेतल्याचे कथन केले आहे. तसेच सदर जमिनीच्या उत्पन्नातून व त्याच्या नोकरीच्या पैशातून प्रतिवादी क्र. १ च्या नावे गट नं. ३४४ मधील क्षेत्र दि.०५.०९.१९८९ रोजी खरेदी केल्याचे कथन केले आहे. सा. क्र. ०१ चे पुराव्यामध्ये पुढे त्याने सन १९९० मध्ये वडीलांच्या मृत्यूनंतर गट नं. ३४४ मध्ये विहिर खोदून पाईपलाईन केल्याचे व राहण्यासाठी पत्र्याच्या दोन खोल्या व छप्पर बांधल्याचे सांगितले आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ,२ व त्याने त्याच्या नावावरील गट नं. १२२/१, १२२/३ व १२२/४ या मिळकती एकत्र विचार करुन नोंदणीकृत बक्षिसपत्रान्वये करुन दिलेल्या आहेत. त्यानंतर त्याच्या व प्रतिवादी क्र. १ च्या पैशातून गट नं. ११६ मधील जमिन एकत्र कुटूंबाच्या फायदयासाठी प्रतिवादी क्र. १ च्या नावे खरेदीखताने घेतल्याचे सांगितले आहे. तसेच त्यामध्ये विहिरीवरून पाईपलाईन

केल्याचे सांगितले आहे. तसेच गट नं. २३१ मधील जमिन प्रतिवादी क्र. ३ ने प्रतिवादी क्र. ५ च्या नावावर दि. ०३.०८.२०१० रोजी पोकळीस्त व नामधारी खरेदीखताने विक्री केल्याचे कथन केले आहे. पुढे त्याने पुराव्यामध्ये सदर मिळकतींचे एकत्रीत उपभोग घेणे मुश्कील झाल्याने दि. २७.०३.२०११ रोजी कुटूंबाची बैठक घेवून वाटपाची मागणी केली असता प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांनी त्यास नकार देवून सदर मिळकती विक्रीबाबत लोकांशी सौदे सुरु केल्याचे कथन केले आहे.

**२०.** वादीने पुढे निशाणी ७३ कडे सा. क्र. ०२ चा पुरावा नोंदविलेला आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यामध्ये गट नं. २३१ मधील जमिनीचे प्रतिवादी क्र. ०२ व त्याची पत्नी मथुराबाई यांनी दि. ०३.०८.२०१० रोजी फसवून खरेदीखत करुन घेतल्याचे सांगितलेले आहे.

**२१.** वादीने त्याच्या वाद कथनांच्या पृष्टयर्थ निशाणी ०८ कडे गट क्र. ८३ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उता–यात दादाबा बाबुराव बुधवंत यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. वादीने निशाणी ९ कडे गट क्र. ९६७ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे त्यावर देखिल दादाबा बाबुराव बुधवंत यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते.

**२२.** वादीने पुढे निशाणी १०, ११, १२ कडे गट नं. १२२/१, १२२/३ व १२२/४

चे ७/१२ उतारे दाखल केले आहेत, त्यावर प्रतिवादी क्र. २ व वादी यांचे नाव नमुद असल्याचे दिसून येते. निशाणी १३ कडे वादीने गट क्र. ३४४ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. सदर ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. नि १४ कडे वादीने गट क्र. २३१ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र. ५ च्या नावाची नोंद दिसून येते. निशाणी १५ कडे वादीने गट क्र. ११६ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर उता–यावर प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते.

**२३.** वादीने निशाणी १६ कडे फेरफार क्र. ४९९ दाखल केला असून त्यावरून यशवंत गणपत निमसे यांचेकडून वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी सन १९८८ मध्ये जमिन खरेदी केली असल्याचे दिसून येते. वादीने पुढे निशाणी १७ कडे फेरफार क्र. ७८१ दाखल केला आहे. सदर फेरफारवरून विक्रम रघुनाथ बुधवंत यांचेकडून प्रतिवादी क्र. १ ने सन १९९४ मध्ये जमिन खरेदी केली असल्याचे दिसून येते. पुढे वादीने निशाणी १८ कडे फेरफार क्र. १३०४ दाखल केला असून त्यावरून वादीने त्याच्या पत्नीच्या नावे सन १९९९ मध्ये बक्षिसपत्र करुन दिले असल्याचे दिसून येते. निशाणी १९ कडे वादीने फेरफार क्र. १३६६ चा उतारा दाखल केला आहे. सदर उता–यावरून सुशिला मारूती बुधवंत यांचेकडून प्रतिवादी क्र. १ ने जमिन खरेदी केली असल्याचे दिसून येते. शेवटी

वादीने निशाणी २० कडे फेरफार क्र. १९६८ दाखल केला असून त्यावरुन मयत प्रतिवादी क्र. २ रखमाबाई यांचेकडून प्रतिवादी क्र. ५ ने सन २०१० मध्ये जमिन खरेदी केली असल्याचे दिसून येते.

**२४.** प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. ३, ४, ७ व ८ यांनी पुरसीस देवून दावा मान्य केला असून इतर प्रतिवादींविरुध्द दावा एकतर्फा चालविणेत आला. सदर प्रतिवादींनी प्रकरणामध्ये कोणताही पुरावा दिलेला नाही.

**२५.** प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीने वर विवेचन केलेली कागदपत्रे व तोंडी पुरावा दिलेला आहे. सदर तोंडी पुराव्याप्रमाणे व वादीच्या वादकथनांप्रमाणे केवळ गट क्र. ८३ व १६७ या मिळकती वडीलोपार्जित असल्याचे दिसून येते. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील मिळकत क्र. ०३ ते ०८ या मिळकती एकत्र कुटूंबाच्या जमिनीच्या उत्पन्नातुन व प्रतिवादी क्र. २ व वादी यांच्या नोकरीच्या पैशातून घेतल्या आहेत. सदर एकंदरीत वादकथनांवरुन एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून व नोकरीतून वादी व प्रतिवादी यांना नेमके किती उत्पन्न येत होते याबाबत वादीने कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. तसेच त्याच्या व प्रतिवादी क्र. २ यांच्या नोकरीबाबत देखिल स्पष्ट पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसून येत नाही.

**२६.** जेव्हा वादी वाद मिळकती पैकी मिळकत क्र. ०३ ते ०८ या एकत्र कुटूंबाच्या

उत्पन्नातून व नोकरीच्या पैशातून घेतल्याचे कथन करतो त्यावेळी वादीने एकत्र कुटूंबाचे उत्पन्न येत होते ही बाब प्रथमपणे शाबित केली पाहिजे. तसेच त्याकरीता कागदोपत्री अथवा स्पष्ट असा पुरावा हा उत्पन्नाकरीता दाखल करणे गरजेचे असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये असा पुरावा वादीने दिलेला नाही. तसेच वादीच्या कथनाप्रमाणे त्याच्या बहिणींनी वडीलांच्या हयातीमध्ये वाद मिळकतीमधील हिस्सा सोडून दिला असल्याचे नमुद केले आहे. परंतु, स्थावर मिळकती ज्यांची किंमत १००/- रु. किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास त्यातील हक्क हा केवळ नोंदणीकृत हक्कसोड पत्राप्रमाणे सोडता येतो.

**२७.** वर नमुद विवेचनाप्रमाणे वादीने संभाव्यतेच्या प्राबल्याच्या आधारे केवळ गट क्र. ८३ व १६७ या मिळकती वडीलोपार्जित असल्याचे शाबित केलेले आहे. इतर मिळकती हया खरेदीखताने वादी, प्रतिवादी क्र. १, प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र. ५ यांच्या नावे असल्याने स्पष्ट पुराव्याखेरीज त्या एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून घेतल्या आहेत हे शाबित होत नाही. सबब, वाद मिळकतींपैकी गट क्र. ८३ व १६७ या मिळकती वडीलोपार्जित असल्याने त्यामध्ये वाटप मिळण्यास वादी पात्र आहेत.

**२८.** प्रस्तुत प्रकरण सुरु असताना प्रतिवादी क्र. ३ या मयत झाल्या असल्याने वादी, प्रतिवादी क्र. १, २, ६, ७ व ८ हे वर नमुद वाद मिळकत गट क्र. ८३ व १६७ मध्ये सहहिस्सेदार असल्याचे स्पष्ट होते. सबब, सदर दोन्ही मिळकतींमध्ये वादी, प्रतिवादी

क्र. १, २, ६, ७ व ८ यांचा प्रत्येकी १/६ इतका हिस्सा येईल. सबब मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र. ०२ च्या उत्तरार्थ वर नमुद केल्याप्रमाणे निष्कर्ष नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र.३ व ४ बाबतः**

**२९.** वादीच्या वाद कथनाप्रमाणे व तोंडी पुराव्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १, २ व ५ यांनी वाद मिळकतीपैकी ०३ ते ०६ या मिळकती विक्री करणेकरीता सौदेबाजी सुरु केली आहे. परंतु, वादीने त्याने सदर मिळकत कोणाला विक्री करणेबाबत सौदेबाजी सुरु केली आहे किंवा त्याबाबत काय प्रयत्न केले आहेत याबाबत स्पष्ट पुरावा दिलेला नाही. तसेच वाद मिळकतींपैकी केवळ अ. क्र. १ व २ या मिळकती वडीलोपार्जित असल्याचे निष्कर्षापर्यंत मी आलो असल्याने मिळकत क्र. ०३ ते ०६ यांच्याबाबत मनाई देता येणार नाही. सबब, या दोन्हीही मुद्दयांचे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ बाबतः**

**३०.** वरील विवेचनावरुन वादीचा दावा अंशतः मंजूर होण्यास पात्र असल्याचे निष्कर्षापर्यंत मी पोहोचलेलो आहे. प्रस्तुत प्रकरणातील वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध विचारात घेता प्रत्येक पक्षकारांनी आपआपला खर्च सोसावा. सबब, प्रस्तुत मुद्याच्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| **१.** | प्रस्तुत दावा अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | वाद मिळकतीमध्ये (दावा कलम 1 मध्ये सविस्तर वर्णन केल्याप्रमाणे गट क्र. ८३ व १६७ मध्ये) वादी, प्रतिवादी क्र. १, २, ६, ७ व ८ यांचा प्रत्येकी १/६ इतका हिस्सा आहे असे जाहिर करण्यात येते. |
| **३.** | वाद मिळकत गट क्र. ८३ व १६७ मधील वादी, प्रतिवादी क्र. १, २, ६, ७ व ८ यांचा प्रत्येकी १/६ इतका हिस्सा पृथ्थक करुन देण्यात यावा. |
| **४.** | वाद मिळकत गट क्र. ८३ व १६७ च्या वाटपाकरीता दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम ५४ प्रमाणे प्रकरण मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे पाठविण्यात यावे. |
| **५.** | वादीची मनाईची विनंती फेटाळण्यात येते. |
| **६.** | येणेप्रमाणे प्राथमिक हुकुमनामा तयार करण्यात यावा. |
| | ***(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात तोंडी सांगुन टंकलिखित करण्यात आला व घोषीत करण्यात आला.)*** |

Digitally signed by SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
DN: c=IN, o=BOMBAY HIGH COURT, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950294, postalCode=400001, st=Maharashtra, serialNumber=a141e942a1599350c9e218a76b562e7b4a7f83f2030ebfe78fa3c19c2f168be2, cn=SHIRISHKUMAR DIGAMBAR WAGHMARE
Date: 2026.04.10 17:10:25 +05'30'

**दि.१०.०४.२०२६** **(शिरीषकुमार दि. वाघमारे)**
**पाथर्डी.** **सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाथर्डी.**

मी प्रमाणित करते की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ न्यायनिर्णय मधील मजकूर हा एकसारखा आहे.

स्टेनोग्राफरचे नांवः रोहिणी आमटे,

कोर्टाचे नांव : शिरीषकुमार दि. वाघमारे,
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पाथर्डी.

दि. १०.०४.२०२६

पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीखः १०.०४.२०२६

न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीखः १०.०४.२०२६